# पोलीस अधिक्षक,बीड

## पोलीस शिपाई चालक भरती-२०१९

## शुध्दीपत्रक

दिनांक ३०.११.२०१९ रोजी **पोलीस अधिक्षक बीड** यांच्या आस्थपनेवरील पोलीस शिपाई चालक ( गट-क) ची पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचेमार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.हया जाहीरातीत स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे,रद्य करणे,अंशत बदल करणे,पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधित पोलीस घटक प्रमुखांना राहतील.व त्यांचा निर्णय अंतिम असेल असे स्पष्ट करण्यात आले होते.त्यानुषंगाने त्यामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१.मुद्या क्र. ५:- ऑनलाईन परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या " **ऐवजी ऑफलाईन OMR based परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या** " असे वाचावे.

२.मुद्या क्र.११.१३ आणि १३.३ मध्ये " उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडु शकतो.तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमुन देण्यात येईल " हे शब्द वगळण्यात येत असुन त्या ऐवजी **"उमेदवाराच्या परीक्षा प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या लेखी परिक्षा केंद्रावर नमुद दिनांकास उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे."**

**३.** सदरील जाहीरातीत जेथे जेथे " **ऑनलाईन परीक्षा** " असे नमुद केले आहे त्या सर्व ठीकाणी **"ऑफलाईन परीक्षा"** असे वाचावे.

मुद्या क्र.८:- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक राआधो ४०३९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये एसईबीसी हे आरक्षण रद्य करण्यात आले आहे.त्यामुळे शासन निर्णय दि.३१/०५/२०२१ व शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी२०२०/प्र.क्र.३२०/१६-ब,दि.०५/०७/२०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार एसईबीसी या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागा अराखीव ( खुल्या ) प्रवर्गात समाविष्ट करण्यात याव्यात.सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता दिलेले आरक्षण रद्य झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता निश्चीत केलेल्या आरक्षणातंर्गत आवेदनपत्र भरले होते , त्यांचे करीता पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :-

(i) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटीशन क्र.३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ०५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार एसईबीसी उमेदवारांचा अराखीव व इडब्लुएस प्रवर्गातुन विचार करण्यात यावा व असे करताना एसईबीसीच्या ज्या उमेदवांराना अराखीव प्रवर्गाकरिता विहीत करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांच्याबाबतीत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादा व परीक्षा शुल्काची सवलत कायम ठेवण्यात यावी.

(ii) मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि.०५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६/-ब, दिनांक ०५/०७/२०२१ मधील परिच्छेद क्र. ७ मधील तरतुदीनुसार एसईबीसी वर्गाकरीता राखीव असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन व एसईबीसी प्रवर्गातुन अर्ज केलेल्या उमेदवारांकंडुन ' **अराखीव** अथवा **आर्थिक दृष्टया मागास** ' प्रवर्गाचा विकल्प घेऊन पुर्व परीक्षेचे आयोजन करावे असे नमुद आहे.

(iii) उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता निश्चीत केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते अशा उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार आर्थिक दुर्बल घटक ( EWS) आरक्षणाचा लाभ अथवा अराखीव ( खुला ) यापैकी एक विकल्प निवडावा.

(iv) जे उमेदवार आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छुक / पात्र असतील तर त्यांनी संकेतस्थळावर जाऊन (EWS) विकल्प निवडावा.

(v) ४ (iv) वगळता **EWS न निवडलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन अराखीव ( खुला ) हयावर क्लिक करुन अराखीव (खुला) पदाचा विकल्प निवडावा.**

(vi) एसईबीसी या प्रवर्गातील जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक हा विकल्प निवडतील त्या उमेदवारांनी **शारीरीक चाचणीच्या वेळी** आर्थिक दुर्बल घटकाबाबतचे प्रमाणपत्र सोबत आणावे.जे उमेदवार प्रमाणपत्र



Scanned with CamScanner

सादर करणार नाहीत, त्यांना पुढील भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.तसेच त्यांना त्यावेळी प्रवर्गही बदलता येणार नाही.

(vii) **सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव ( खुला प्रवर्ग ) विकल्पाबाबतच्या ईडब्ल्युएस प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.राआधो४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६/०७/२०२१ मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

१. **निवड प्रक्रियामध्ये एसईबीसी उमेदवारांनी केलेल्या ज्या जाहीरातीमध्ये ईडब्ल्युएस आरक्षण लागु आहे,अशा निवडप्रक्रियामध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्युएस आरक्षण अनुज्ञेय करताना, सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परीक्षासांठी मार्च २०२० पर्यंत ग्राहय असणारे ईडब्ल्युएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

२. **ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला ) असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधित पदाची/ परीक्षेची जाहिरात ( दोन किंवा अधिक टप्प्याची परीक्षा असल्यास पुर्व परीक्षेची ) प्रसिध्द झालेला आहे,त्या जाहिरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्त केलेले नॉन क्रिमिलेअर (NCL) प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राहय धरण्यात यावे.**

(viii) आर्थिक दुर्बल घटक (EWS) व अराखीव (खुल्या) चा विकल्प घेण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर पोलीस कॉर्नर या बटनवर क्लिक केल्यानंतर पोलीस भरती- २०१९ वर क्लिक करावे.त्यानंतर web link वर क्लिक करुन उमेदवारांनी ज्या घटकासाठी आवेदनपत्र सादर करण्यात आलेले आहे त्या घटकासाठी URL देण्यात आलेला आहे.त्यावर क्लिक करावे व त्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

(ix) **विशेष सुचना:- प्रत्येक उमेदवारांनी वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर जाऊन त्यांनी ज्या घटकातंर्गत आवेदनपत्र सादर केलेले आहेत त्या घटकातंर्गत निवड करुन उमेदवारांनी स्वत:चा password बदल करुन घ्यावा.**

(x) एसईबीसी प्रवर्गातुन अर्ज केलेल्या उमेदवांराना ' अराखीव ' अथवा '**आर्थिक दृष्टया मागास** ' प्रवर्गाचा विकल्प निवडण्याची सुविधा हे शुध्दीपत्रक झाल्यापासुन म्हणजेच दि.०५.०८.२०२१ पासुन ते दिनांक १५.०८.२०२१ पर्यंत उपलब्ध राहील.

ठीकाण:- बीड
दिनांक:- ०३/०८/२०२१

( आर.राजा )
पोलीस अधिक्षक, बीड



Scanned with CamScanner